दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५० • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.१ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## 'मविआ'चा जागावाटपाचा फार्म्युला ठरला?

# ठाकरे २३,काँग्रेस १६,पवार गट ९ जागांवर लढणार; 'वंचित'साठी ठाकरे मन मोठे करणार

**मुंबई–महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरल्याची माहिती सुत्रांकडून देण्यात आली आहे. सुरूवातीपासून आग्रही असलेले शिवसेना ठाकरे गट लोकसभेच्या ४८ पैकी २३ जागांवर लढणार आहे. त्यापैकी २ जागा ठाकरे गट मित्रपक्षांना देणार आहे. तर काँग्रेसच्या वाटेला १५ ते १७ जागा मिळणार असून राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला ९ ते ११ जागा मिळणार असल्याची माहिती विश्वसनिय सूत्रांकडून देण्यात आली.**

ठाकरे गट मुंबईत ४ जागा लढण्याच्या तयारीत आहे. शरद पवार गट उत्तर मुंबईसाठी उत्सुक नाही. त्यामुळे उत्तर मुंबईची जागा कुणी लढणार नसेल तर ठाकरे गट लढणार असेही सांगितले जात आहे.ठाकरे गटाचा सुरुवातीपासूनच लोकसभेच्या ४८ पैकी २३ जागांवर दावा आहे. विशेष म्हणजे यापैकी २१ जागांवर शिवसेना ठाकरे गट निवडणूक लढणार आहे. तर २ जागा मित्रपक्षांना देण्याची तयारी ठाकरे गटाची आहे. यातली हातकणंगले ही एक जागा ठाकरे गट राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेसाठी सोडायला तयार आहे. तर अकोल्याची एक जागा ठाकरे गट मित्रपक्ष असलेल्या वंचित बहुजन आघाडीला देखील सोडायला तयार आहे. वंचित सोबत आल्यास त्यांना आणखी एक ते दोन जागा दिली जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.कोल्हापूरच्या जागेच्या



बदल्यात ठाकरे गटाने काँग्रेसकडे सांगलीची जागा मागितली आहे. हातकणंगले ही जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडे जातेय. तर रत्नागिरी–सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, कल्याण डोंबिवली, पालघर, नाशिक, शिर्डी, जळगाव, मावळ, धाराशिव, परभणी, छत्रपती संभाजीनगर, रामटेक, बुलढाणा, हिंगोली आणि यवतमाळ या जागांवर ठाकरे गट निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.काँग्रेस नागपूर, भंडारा–गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावची, अकोला या जागांवर निवडणूक लढवणार आहे. काँग्रेस आपल्या कोट्यातून एक जागा वंचितला देण्याच्या तयारीत आहे. तसेच लातूर, नांदेड, जालना, धुळे, नंदुरबार, पुणे, सोलापूर आणि सांगली अशा जागा काँग्रेसच्या वाटेला आहेत. भिवंडी जागेसाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांनी दावा केलाय. तसेच त्यांनी उमेदवारावरही दोन्ही पक्षांनी दावा केलाय. उत्तर मध्य मुंबई ही जागा काँग्रेसच्या वाटेला आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाला बारामती, शिरुर, बीड, दिंडोरी, रावेर, अहमदनगर, माढा, सातारा, वर्धा या जागा मिळण्याची दाट शक्यता आहे.

### कोल्हापूरच्या जागेवर अद्यापही पेच कायम

ठाकरे गट जवळपास २३ जागांवर लढणार आहे. यात विशेष करून कोल्हापूरच्या जागेवर सध्या पेच आहे. ही जागा सध्या शिवसेना ठाकरे गटाकडे आहे. कोल्हापूरचे खासदार सध्या ठाकरे गटाचे आहेत. पण काँग्रेसला ही जागा हवी आहे. कोल्हापूरचे छत्रपती घराण्याचे वंशज शाहू महाराज छत्रपती यांच्यासाठी काँग्रेसला ही जागा हवी आहे.

# दुर्मिळ आजार असणाऱ्या हिमोफिलिया रुग्णांसाठी हिमोफिलिया डे-केअर सेंटर कार्यान्वित

## आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ.तानाजी सावंत यांच्या हस्ते उद्घाटन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथील हिमोफिलिया डे केअर सेंटरचे उद्घाटन राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ.तानाजी सावंत यांच्या हस्ते ऑनलाईन स्वरूपात करण्यात आले.

हिमोफिलिया सारख्या दुर्मिळ आजार असणाऱ्या रुग्णांसाठी अपर मुख्य सचिव दीपक मैसेकर, आयुक्त धीरजकुमार तसेच संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांच्या मार्गदर्शनानुसार हिमोफिलिया डे केअर सेंटरचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय चंद्रपूर येथे उद्घाटन करण्यात आले.यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे, अतिरिक्त जिल्हा शल्य



चिकित्सक डॉ.भास्कर सोनारकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. अभय राठोड, माया आत्राम, अधिपरिचारिका सपना बावणे, विकास वाढई, दीपक डंबारे उपस्थित होते.हिमोफिलिया रुग्णांस वर्षातून १० ते १२ वेळा रक्तस्त्राव होण्याची संभावना असते व त्याकरीता फॅक्टर ७, फॅक्टर ८(अ) व फॅक्टर ९(ब) रुग्णास आवश्यकता असते. जिल्ह्यामध्ये आजपर्यंत २८ रुग्णांची नोंद झाली असून संपूर्ण महाराष्ट्रात हिमोफिलिया रुग्णास आवश्यकता असणाऱ्या घटकांचा तुटवडा पडू न देण्याचा मानस आहे, असे राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत यावेळी म्हणाले. म्हणून प्रत्येक जिल्ह्यामध्ये रुग्णांना अत्यावश्यक वेळी इतर कोणत्याही ठिकाणी जाण्याची गरज नसावी, याकरीता हिमोफिलिया सेंटर प्रत्येक जिल्ह्यात स्थापित केले आहे. यामध्ये प्रत्येक फॅक्टरची उपलब्धता असेल. पूर्वी या सुविधेचा लाभ घेण्यास रुग्णांना नागपूर येथे जावे लागत होते. मात्र, आता ही सुविधा चंद्रपूरमध्येच उपलब्ध झाली आहे. याचा उद्देश म्हणजे समुदायातील हिमोफिलिया असलेल्या व्यक्तींसाठी विशेष काळजी आणि समर्थन प्रदान करणे आहे. हा उपक्रम दुर्मिळ रक्तस्त्राव विकार आणि प्रभावित झालेल्या लोकांसाठी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी समर्पित आहे.

# तेलंगणातील वनपरिक्षेत्र अधिकारी यांची वन अकादमीला भेट



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

तेलंगणा येथील दुलापल्ली वन अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या ८ महिला व २७ पुरुष असे एकूण ३५ वनपरिक्षेत्र प्रशिक्षणार्थी अधिका-यांनी वन अकादमी, चंद्रपूर येथे भेट दिली. तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या अभ्यासाचा एक भाग म्हणून सदर प्रशिक्षणार्थी अधिकारी २८ फेब्रुवारी रोजी वन अकादमीमध्ये दाखल झाले होते.

यावेळी वन अकादमीचे संचालक श्रीनिवास रेड्डी यांनी तेलंगणा येथील वनपरिक्षेत्र प्रशिक्षणार्थी अधिका-यांना महाराष्ट्रातील वन आणि वन्यजीव व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले. तसेच भारताच्या भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के पर्यंत जंगल आणि वृच्छादन वाढविण्यासंदर्भात राष्ट्रीय लक्ष गाठण्याचे आवाहन केले.

# सालफळ येथील कॅनलमध्ये बुडून बापलेकाचा मृत्यू

## आर्वी तालुक्यातील सालफळ येथील घटना

### सालफळ,विरूळ परिसरात सर्वत्र शोककळा

**वर्धा । अविनाश भोपे**

जिल्यातील आर्वी तालुक्यातील विरूळ परीसरात असलेल्या सालफळ येथील कॅनल मध्ये बुडून बापलेकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना २८ फेब्रुवारीला सायंकाळी ५.३० च्या सुमारास घडली. सालफळ येथील अरविंद मधुकर कोहळे वय ५५ व चेतन अरविंद कोहळे १८ हे दोघे बापलेक कॅनल जवळील शेतात पाण्याचे ओलित करीत होते.ओलीत संपल्यावर मुलगा चेतन हा पाय धुण्यासाठी कॅनल वर गेला व पाय घसरून कॅनल मध्ये पडला.त्याला वाचविण्यासाठी वडील अरविंद कोहळे हे गेले असता दोघही बापलेक कॅनलच्या पाण्यात बुडाले व या घटनेत दोघाही बापलेकाचा दुर्दैवी मृत्यू झाला.रात्री उशिरापर्यंत बापलेक घरी न आल्याने गावातील पन्नास साठ लोक शेताच्या रस्त्याने निघाले असता त्यांना बैल एकटेच येतांनी दिसले नंतर शेताजवळ जाऊन पाहता तर त्या दोघांच्याही चपला कॅनेल च्या जवळ दिसल्याने गावकऱ्यांना ही माहिती होताच घटना स्थळावर





गावकऱ्यांनी धाव घेतली व दोघा ही बापलेकाचा शोध सुरू झाला असतां रात्री अकरा वाजता वडीलांचा म्रुतदेह सापडला तर मुलाचा २९ फेब्रुवारीला सकाळी सहा वाजता च्या सुमारास म्रुतदेह सापडला.याबाबत पुलगाव पोलिस ठाण्यात तक्रार केली असुन पोलिसांनी दोन्ही मृतदेह पुलगाव येथै सामान्य रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी नेले. या दुर्दैवी घटनेने विरूळ परिसरात सर्वत्र शोककळा पसरली आ.हे पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहे.

## अंतरिम अर्थसंकल्पातून राज्यातील तिजोरीची लूट

# गोरगरीब,शेतकरी व सर्वसामान्यांवर अर्थसंकल्पातून अन्याय-अंबादास दानवे

**मुंबई**–सरकारने सादर केलेला अंतरिम अर्थसंकल्प हा राज्याची तिजोरी लुटणारा असल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. हा अंतरिम अर्थसंकल्प बेरोजगार, गोरगरीब, शेतकरी व सर्वसामान्यांना न्याय न देणारा असल्याचे सांगत दानवे यांनी जनतेच्या हितविरोधी असलेल्या या अर्थसंकल्पाचा निषेध नोंदवला. युती सरकारने राज्याला आर्थिक डबघाईला नेलं आहे. सरकारने गेल्या वर्षी घोषणा केलेल्या पंचामृतातील एकही थेंब पडला नसल्याचे दानवे यांनी म्हटले. अंतरिम अर्थसंकल्पावर दानवे बोलत होते.

ग्रीन बुकमध्ये ६ लाख ५७ हजार ७१९ कोटी रुपये तर वित्तमंत्री यांनी केलेल्या अर्थसंकल्पाच्या भाषणात ६ लाख ५२२ कोटी आहे, या दोन्ही आकड्यात तफावत असल्याचे दानवे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. २०२३-२४ मध्ये मूळ बजेटमध्ये ६ लाख २ हजार कोटी होते. परंतु आज सरकारने २०२३-२४ सुधारित बजेट ६ लाख ५६ हजार ११३ कोटी रुपयांचे सादर केलं आहे. सुमारे ५४ हजार कोटी रुपयांचा सरकारचा अंदाज चुकला आहे. महसुली खर्चासाठी ४ लाख ६५ हजार ६४५ कोटी खर्चाचा अंदाज असताना यंदा सरकारने ५ लाख ५ हजार ६४७ कोटी रुपये महसुली खर्चाचे सुधारित अंदाज दिले आहेत. महसुली खर्चात ४० हजार कोटी रुपयांची वाढीव उधळण सरकारने कंत्राटदारांना पोहचण्यासाठी व राज्याची आर्थिक स्थिती बिघडवण्यासाठी केली असल्याचा आरोप दानवे यांनी केला.राज्य कर्जबाजारी दिशेने वाटचाल करत असून राज्यावर ७ लाख ८२ हजार ९९१ कोटी रुपयांवर या सरकारने नेऊन ठेवला आहे. येणाऱ्या महसुलातून ९.९९ टक्के रक्कम ही कर्जाचे व्याज भरण्यात जात असून भविष्यात ११.३७ टक्क्यांइतके हे व्याजदर वाढणार असल्याची भीती दानवे यांनी व्यक्त केली. आदिवासी विभागाला अपुरा निधी, विदर्भ मराठवाडयाला सापत्नीक वागणूक या बजेटमध्ये देण्यात आली असून अनुसूचित जाती जमातीचा खर्चही कमी करण्यात आला आहे. तर स्वतःच्या प्रसिद्धीसाठी माहिती व जनसंपर्कावर सर्वांत जास्त तरतूद व वाढ दाखवण्यात आली असल्याचा आरोप दानवे यांनी केला.



# बाबो.. परसोडी शिवारातून ५० बकऱ्यांसह दोन पुरुषांना पळवून नेले

### अज्ञात चोरांचे अनाकलनीय धाडस

**सिंदीरेल्वे**–गुरे किंवा इतर पशूधन पळविणारे चोर सर्वांनी बघितले असतील.पण,४२ बकऱ्या आणि ८ बोकडांसह रखवाली करणाऱ्या दोन नोकरांना देखील शेतातून पळवून नेल्याची तक्रार स्थानिक पोलिसांना दि.२९ फेब्रुवारीला प्राप्त झाली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बुधवारी दि.२८च्या रात्री अज्ञात चोरांनी मौजा परसोडी येथील युगल सत्यनारायण औचट यांच्या शेतातील गोठ्यात बांधून ठेवलेल्या ४२ बकऱ्या आणि ८ बोकड पळवून नेल्याचे शेतमालक युगल औचट यांच्या गुरुवारी लक्षात आले.विशेष म्हणजे चोरांनी त्या शेतात रखवाली करणाऱ्या चाळीस वर्ष वयाच्या दोघांना सुध्दा सोबत नेले आहे.यात औचट यांचे अंदाजे ५ लाख २६ हजारांचे नुकसान झाले.दि.२९ ला सकाळी शेतमालक नोकरांना घरी पाठविण्याकरिता शेतात गेले असतांनाच हा प्रकार लक्षात आला.त्यांनी शिवारात शोध घेतला,परंतु कोठेही सुगावा लागला नाही. त्याबाबतची तक्रार युगल औचट यांनी पोलिसांकडे दिली.नोकर विठ्ठल परचाके वय ४० आणि रामा बोरीकर वय ३६ रा.सिंदीरेल्वे हे दोघे सुध्दा गायब असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.या प्रकरणी स्थानिक पोलिस दोन्ही नोकरांसह बकऱ्यांचा शोध घेत आहेत.नोकरांनीच हा बनाव रचला असावा,अशी शंका अनेकांनी व्यक्त केली आहे.

# रत्नागिरी–सिंधुदुर्ग लोकसभेची जागा ही भाजपचीच–राणे

**मुंबई**–महाविकास आघाडीच्या वतीने विद्यमान खासदार विनायक राऊत हेच रत्नागिरी – सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातील उमेदवार असतील, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. मात्र, त्यांना टक्कर देण्यासाठी महायुतीत राणे, चव्हाण, जठार की सावंत कोणाला संधी देण्यात येईल याची चर्चा गेल्या काही दिवसापासून सुरू आहे. मात्र, आता या मतदारसंघात केंद्रीय मंत्री नारायण राणे हे भाजपच्या तिकिटावर उमेदवार असतील, ते जवळपास निश्चित मानले जात आहे. यासंबंधीचे संकेत राणे यांनी स्वतः दिले आहेत. रत्नागिरी – सिंधुदुर्ग हा लोकसभा मतदार संघ भारतीय जनता पक्षाचाच असल्याचा दावा राणे यांनी केला आहे.

# राज्यात कायदा व सुव्यवस्था कोलमडलेली दरोडा,चोरी,मारामारी,जुगार या सर्वांचे अड्डे वाढले,एकनाथ खडसेंचा हल्लाबोल

**मुंबई**–महाराष्ट्राची ओळख ही संतांची आणि महापुरुषांची ओळख म्हणून आजपर्यंत होती. परंतू, अलीकडच्या काळामध्ये कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती जर पाहिली तर, वाढती गुन्हेगारी ही महाराष्ट्राची ओळख आहे. राज्यभरामध्ये हजारो कोटींचे ड्रग्स येतातच कसे? ५ हजार कोटींचे ड्रग्स पुण्यामध्ये पकडले गेले. परंतू, ते तिथे आलेच कसे? असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांनी उपस्थित केला आहे. या संदर्भात खडसे यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारवर हल्ला चढवला. राज्यात कायदा व सुव्यवस्था कोलमडलेली असल्याचा आरोप करत दरोडा, चोरी, मारामारी, जुगार या सर्वांचे अड्डे वाढले असल्याचे ते म्हणाले.

# कलेकडे झुकलेली मराठी भाषा अधिक समृद्ध आहे-करंजीकर

**मुंबई | प्रतिनिधी**

शास्त्राशी जोडलेलया भाषा आणि कलेशी जोडलेलया भाषा यामध्ये मराठी ही भाषा संपूर्णपणे कलेकडे झुकते. ४८ वर्ण, व्यंजने, त्यातले स्वर, उच्चराधित शब्द त्यातून तयार होणारी बोली यातून तयार होणारे पर्यावरण मराठी भाषेशिवाय कुठेही नाही. त्यामुळे मराठीला मी बेलबुट्टीची भाषा समजतो. भारतावर ७०० वर्षात अनेक आक्रमणे होऊनही हा देश स्वतःची संस्कृती जपत सर्वाना सामावून घेऊन उभा आहे. तसेच मराठीचे झाले आहे. आपली भाषा ही विस्तृत झाली आहे. मराठीतले अनेक शब्द इंग्रजीमध्ये प्रमाण म्हणून गेले आहेत. त्यामुळे मराठीच्या भविष्याबद्दलचा न्यूनगंड काढून टाका अहंगंड बाळगायला हरकत नाही मात्र आहे तो गंड बाळगायला हरकत नाही. सुंदरतेची आस असणारी महत्वाची देशातली भाषा म्हणजे मराठी भाषा आहे.भाषा हा आपल्या जगण्याचा अपरिहार्य भाग आहे असे मला वाटते. असे प्रतिपादन विख्यात लेखक, अभिनेते आणि सुजाण विचारवंत दीपक करंजीकर यांनी व्यक्त केले. दादर सार्वजनिक वाचनालय आणि धुरू हॉल ट्रस्टस, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रम दादर येथे आयोजित करण्यात आला होता. ते पुढे असेही म्हणाले की, जगात १० कोटी लोकांकडून बोलली जाणारी मराठी ही १० व्या क्रमांकाची भाषा आहे. भाषा दोन प्रकारे व्यक्त होते एक भाषेत पुस्तकं छापली जातात आणि ती बोलली जाते. आपली मराठी भाषा १३२ देशांमध्ये पोहोचली आहे. दरवर्षी ५०० दिवाळी अंक आणि २००० पुस्तके निघतात आणि देशातल्या अनेक भाषांमध्ये काहींची भाषांतरे होतात. प्रत्येक क्षेत्रांत मराठी माणसाने जे काम केले आहे ते माईलस्टोन ठरले आहे. जी. ए. कुलकर्णी यांच्यापेक्षा जगात कुणी मोठे नाही. शेक्सिपयरपेक्षा कानेटकरांच्या नाटकांचे





विषय पाहिले तर त्यांचा पट मोठा आहे.

साहित्यप्रेमी आणि ज्येष्ठ स्तंभलेखक रविप्रकाश कुलकर्णी आपल्या भाषणात म्हणाले की, दिवाळी अंकांची कल्पना महाराष्ट्रातील काशिनाथ रघुनाथ मित्र यांना सुचली ती बंगालच्या दुर्गापूजा अंकामुळे असे अनेक जण आजही बोलताना व लिहिताना दिसतात , परंतु हे चूक आहे हे आता सिद्ध झालेले आहे, तरीसुद्धा ही चूक दुरुस्त करण्याची तसदी आपले लोक का घेत नाहीत ही गोष्ट बंगाली आणि इंग्रजी दैनिकांतून ठसठशीतपणे यायला हवी. दिवाळीचा सण दिवाळी अंकांशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. मराठी संस्कृतीत अढळ स्थान लाभलेल्या या दिवाळी अंकांच्या वैभवशाली परंपरेचा आढावा घेताना ते पुढे म्हणाले की, 'दिवाळी-दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा' या उक्तींमधील आनंद दिवाळी साजरा करण्यातील अनेक गोष्टींइतकाच दिवाळी अंक हा त्याचा अविभाज्य भाग बनला आहे. त्यामुळे दिवाळीचा आनंद द्विगुणित होतो. गेली ११४ वर्षे मराठी साहित्याचा हा जागर अखंड होत आहे. तो वृद्धिंगत करतांना मराठी वृत्तपत्र लेखक संघाचाही खारीचा वाटा आहे. हे सातत्य इतर भाषांमध्ये फारसे घडताना दिसत नाही. दिवाळी अंकांनी मराठी साहित्यातील विविध प्रकार हाताळले असून, त्यातून अनेक लेखक-साहित्यिक नावारूपास आले आहेत.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षप्रमुख आणि विशेष कार्यअधिकारी मंगेश चिवटे यांना यावेळी संस्थेचे सन्माननीय सभासदत्व प्रदान करण्यात आले. चिवटे यांनी महाराष्ट्रातील गोरगरिबांच्यासह सर्वांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कल्पनेतून आरोग्य कक्षाच्या माध्यमातून किती प्रमाणात आर्थिक मदत आणि सर्वोतोपरी सहकार्य केले जाते याचा समग्र आढावा आपल्या भाषणात घेतला. त्याचप्रमाणे मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांचे आजोबा स्वातंत्र्यसेनानी आणि पत्रमहर्षी मनोहरपंत चिवटे यांच्या स्मरणार्थ दिवाळी अंकांच्या पुरस्कारासाठी ७५ हजार रुपयांची देणगी दिली. त्याचबरोबर संस्थेच्या जागेच्या अडचणींचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. विख्यात शल्य चिकित्सक डॉ प्रणय पाठारे यांनी बालमोहनमध्ये मराठी भाषेत शिक्षण घेतल्यानंतर डॉक्टरकी करताना ती कसोशीने जपण्याचा प्रयत्न करतो यावेळी अनुभवाला येणाऱ्या गमती जमती त्यांनी आपल्या खूखूशीत भाषणात सांगीतल्या. संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी प्रास्ताविक केले. गेली ४९ वर्षे दिवाळी अंक प्रदर्शन आणि स्पर्धेची परंपरा संस्थेच्या अडचणीच्या काळात कशी पार पाडली जात आहे याच्यासह संस्थेच्या आणि भविष्यातील कार्याचा समग्र आढावा त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात घेतला.यावेळी व्यासपीठावर दादर सार्वजनिक वाचनालयाच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती शुभा द कामथे, मराठी विचारधारा प्रतिष्ठानचे विश्वस्त ऍड. देवदत्त लाड, कार्याध्यक्ष रमेश सांगळे, कोषाध्यक्ष आत्माराम गायकवाड उपस्थित होते. 'ग्रंथ तुमच्या दारी' या उपक्रमाचे जनक नाशिकचे विनायक रानडे यांना ग्रंथालय चळवळीतील दिवंगत ज्येष्ठ कार्यकर्ते स्व. दत्ता कामथे स्मृती ग्रंथसखा' पुरस्कार प्रदान करण्यात आला.अवतरण सकाळ (मुंबई ) साठी मनोरंजनकार' का र मित्र स्मृती सर्वोत्कृष्ट अंकाचा पुरस्कार ज्येष्ठ वृत्तसंपादक जयवंत चव्हाण आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत वसंतराव होशिंग स्मृती महिला संपादित उत्कृष्ट अंक - मनोरमा संपादिका सौ शोभा श्रीकांत मोरे सोलापूर यांनी स्वीकारला.अक्षर, वेदान्तश्री, सामना, उद्याचा मराठवाडा या संपादकांसह द इनसाइट या अंकाचे संपादक पत्रकार सचिन परब यांनी तर संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्व विजया मनोहर कोळस्कर स्मृती अमृतप्रेरणा पुरस्कार काही दिवाळी अंकांना प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत ज्येष्ठ कामगार नेते स्व वसंतराव होशिंग स्मृती 'माझ्या बोलीभाषेचे मराठी साहित्य आणि व्यवहारातील स्थान' आणि पार्थ फाउंडेशन पुरस्कृत 'मराठी भाषेची चिंता आणि चिंतन' या विषयावर स्वबोलीभाषेत कुसुमाग्रजांना पत्र या दोन राज्यस्तरीय लेखस्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर आणि कार्यवाह नितीन कदम यांनी केले. दिगंबर चव्हाण, दत्ताराम गवस, विजय ना कदम, सुनील कुवरे, राजन देसाई, श्रीराम मांडवकर, पंकज पाटील, दिलीप ल सावंत आदी कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# वडनेर ग्रामपंचायतच्या वतीने विविध विकास कामाचे भूमिपूजन संपन्न

## सरपंच कविता वानखेडेच्या प्रयत्नाला यश; जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ३६.५० लक्ष रुपये निधी मंजुर

**वडनेर | वार्ताहर**

स्थानिक ग्रामपंचायतला ग्रामविकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ३६.५० लक्ष निधीस मंजुरी प्राप्त झालेली असून त्याअंतर्गत गावात होऊ घातलेल्या विविध विकास कामांचे भूमीपूजन सरपंच कविता वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले.



त्यामध्ये गावातील विकास कामाला प्राध्यान देण्यात आलेले आहे. गावातील विकास कामे व्हावी याकरिता निधी मंजूर व्हावा आणि ग्रामविकासाला गती मिळावी, ही मागणी वडनेर येथील सरपंच कविता विनोद वानखेडे यांनी शासन स्तरावर सतत लावून धरली होती. फलस्वरूप सतत केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याचे सरपंच कविता वानखडे यांनी सांगितले. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मुस्लिम कब्रस्तान सुरक्षा भित बांधकाम करणे (९ लक्ष),कब्रस्तान मध्ये कमानीसह गेट बांधकाम करणे ३ लक्ष, मोहटे यांच्या घराजवळील रपटा व नाली बांधकाम करणे १.५० लक्ष, प्रकाश मेश्राम यांच्या घरापासून ते वैभव सावज यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे ४ लक्ष, बळवंत फाटे यांच्या घरापासून ते देवराव शिंदे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे ९ लक्ष, हेमंत कामडी ते घोडमारे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे ५ लक्ष, संगीता फुलझेले यांच्या घरापासून ते तुकाराम कुबडे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे ५ लक्ष, याठिकाणी वडनेर येथे विविध विकास कामाचे भूमिपूजन सरपंच कविता विनोद वानखेडे यांच्या शुभहस्ते माजी सरपंच विनोद वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. भूमिपूजन कार्यक्रमाला उपस्थित उपसरपंच सुभाष शिंदे, ग्रामपंचायत सदस्य वर्षा भोयर, रीना तागडे , मंदा आत्राम, नम्रता भगत,अरिफ शेख, माजी उपसरपंच हनीफखा पठाण, राजेंद्र भोरे,रहमान पठान,छोटू शेख, रहमान शेख, मंगेश भोयर,शंकर सुरकार, राजू सुरकार, नाजिम पठाण, गणेश सिडाम ,गजानन तागडे, बबलू जीवतोडे, शंकर मुन,सुनील कळसकर, सुरेश काळे, शंकरराव गेडेकर,पंढरी रोडे, धनराज फाटे, बळवंत फाटे, राजू देशमुख, अजय मेहकुरे,हेमंत वैतागे, गजानन मंगरूळकर, गणेश घोडमारे , अशोक घोडमारे, हेमंत कामडी,सोनू पिसे, दिनकर कुबडे, सुबोध भगत,अमर नाईक,सुनील उरकुडे, सुनील लोहकरे,विनोद मंगरूळकर, हर्षल सुरकार,सुनील मेश्राम,लक्ष्मण कन्नाके, मदन भगत, मोहन लोहकरे,घनश्याम भगत, अल्ताफ कुरेशी, मुन्ना सय्यद, राजेंद्र परबत, शौकत शेख,संजय भोयर,तानाजी देशमुख, प्रशांत मंगरूळकर,वैभव सावज, नागरिक उपस्थित होते.

# माविमच्या माध्यमातून महिला स्वावलंबी बनल्या व कारभारीन झाल्या-जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे



**परभणी | प्रतिनिधी**

महिला आत्मनिर्भर होत असताना दिसून येत आहे . महिलानी विविध शासकिय योजनेचे लाभ घ्यावा. महिला बचत करण्यात नेहमी पुढे राहिल्या आहेत. बँक कर्ज परतफेडीचे प्रमाण ९९.९ % आहे हे खरच खूप कौतुकास्पद असून माविमच्या माध्यमातून महिला स्वावलंबी बनल्या व कारभारीन झाल्या असल्याचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे म्हणाले.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), जिल्हा कार्यालय परभणी मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान, नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत ८ लोकसंचलित साधन केंद्रमार्फत स्वयं सहय्यता महिला बचत गटाने तयार केलेल्या वस्तू व मालाचे भव्य विक्री प्रदर्शनाचे आयोजन २७ फेब्रूवारी ते दि. १ मार्च या कालावधीत परभणी क्लब परभणी ( सिटी क्लब ) स्टेशन रोड, परभणी येथे आयोजित करण्यात आले आहे. यावेळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, पोलीस अधिक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा नियोजन अधिकारी किशोरसिंग परदेशी, नाबार्ड सहा.महाप्रबंधक एस.के. नवसारे, सुनिल हटेकर , विभागीय व मूल्यमापन अधिकारी संदीप मराठे, विभागीय उपजीविका सलागर माविम उत्कर्ष भोळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. आरती गीते, अन्न व औषध प्रशासन व्यवस्थापक अरूण तामटकर, सुरेश पवार, जिल्हा समन्वय अधिकारी माविम बाळासाहेब झिंजाडे मनीषा क्षीरसागर, किरण राठोड यांची उपस्थिती होती. यावेळी १६ बचत गटांना १ कोटी ३५ लाख रुपयाचे कर्ज वितरण करण्यात आले. यशस्वी उद्योजक महीलाचा सन्मान करण्यात आला. आठ लोक संचलीत साधन केंद्राचे सत्कार करण्यात आले. प्रदर्शनामध्ये एकुण २१२ महीला बचत गटाचे स्टॉल लावण्यात आले होते.पोलिस अधिक्षक रविंद्रसिह परदेशी म्हणाले की, जिच्या हाती पाळण्याची दोरी तीच जगाचा उधार करी. महिलांनी लक्ष्मीमुक्ती योजना, घर दोघांचे अभियांनातर्गत सर्व महिलांनी आपले नाव नोंदणी करावी. मविमचे कार्य खरच खूप मोठे असून त्यांच्या कार्य खूप कौतुकास्पद आहे. महिलांनी उत्पादित केलेले वस्तू व माल चागल्या प्रतीचे आसून त्यांनी पॅकेजिंग व ब्रॅण्डिंग करून मॉल सोबत व विवध व्यापारी याच्या सोबत करार करावेत . बाळासाहेब झिंजाडे यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले तर सूत्रसंचालन जयश्री टेहरे, अभिमन्यू भोसले यांनी केले तर आभार भावना कुलकर्णी यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता शिवराज राऊत, विनय कुंभार सर्व लोकसंचलित साधन केंद्राचे व्यवस्थापक , लेखापाल, सहयोगीनी, सी. आर.पी. यांनी परिश्रम घेतले.

# संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या सुवर्णरत्न पुरस्काराने अभिजीत जगताप, मुख्तार शेख, सुकुमार देशमुख आणि कल्पना देशपांडे सन्मानित

## संकल्प विद्यामंदिर शाळेने गुणवत्तापूर्ण शाळा अशी स्वतःची ओळख निर्माण केली-शिक्षणतज्ज्ञ प्रा.शिवराज मोटेगावकर

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

येथील संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणा-या सुवर्णरत्न पुरस्कारांचे वितरण यावर्षी रविवार, दि.२५ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. यावर्षी हे पुरस्कार अभिजीत जगताप (पत्रकारिता), मुख्तार शेख (सामाजिक), सुकुमार देशमुख (शिक्षण) आणि कल्पना देशपांडे (कला) यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

रविवारी आद्यकवी मुकूंदराज सांस्कृतिक सभागृहात हा अत्यंत दिमाखदार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बोलताना प्रा.शिवराज मोटेगावकर म्हणाले की, अंबाजोगाई शहर हे सकारात्मक ऊर्जेचा स्रोत आहे. संकल्प विद्या मंदिरने शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्तेचा पॅटर्न निर्माण केला आहे. हे सभागृहातील पालकांची मोठी गर्दी पाहून लक्षात येते, शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, असे वंदनिय महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले. आम्ही स्वतःला खूप भाग्यवान समजतो की, आम्ही या क्षेत्रात कार्यरत आहोत. भगवद्गीतेचा संदर्भ देत विद्या दान हे पुण्याचे काम आहे. शिक्षण क्षेत्रात चोले दांम्पत्य अत्यंत तळमळीने हे कार्य करीत आहेत. प्रा.मोटेगावकर यांनी स्वतःचे अनुभव ही सांगितले. ज्या घरात आई स्ट्राँग असते ते घर मजबूत असते. घरात शैक्षणिक वातावरण निर्माण करा. अभ्यासामुळे जीवनाला दिशा मिळते. विद्यार्थ्यांना अभ्यासाची सवय लावा, आवड निर्माण करा. कारण, शिक्षण हेच सर्वस्व आहे. शिक्षणामुळे जीवनाला गती मिळून कुटुंबाची प्रगती होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा होमवर्क पूर्ण करून घ्यावा, शालेय उपक्रमात सहभागी व्हावे, विद्यार्थी, शिक्षक व पालक यांनी नवे शैक्षणिक धोरण समजून घ्यावे. जेवढा शिक्षक चांगला, तेवढी शाळा चांगली. त्यामुळेच संकल्प विद्यामंदिर शाळेने गुणवत्तापूर्ण शाळा अशी शिक्षण क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण केली आहे. भविष्यात दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संकल्प विद्या मंदिर शाळेचा शैक्षणिक क्षेत्रात वटवृक्ष होणार असल्याचे गौरवोद्गार शिक्षणतज्ज्ञ प्रा.मोटेगावकर यांनी काढले. उद्घाटक म्हणून बोलताना ऍड.शोभाताई लोमटे (ज्येष्ठ विधी तज्ज्ञ तथा समाजसेविका) म्हणाल्या की, शिक्षण क्षेत्रात संकल्प विद्यामंदिर शाळेने गुणवत्तेचा पॅटर्न निर्माण केला आहे. अंबाजोगाई हे शिक्षणाचे माहेरघर आहे. या भागातील विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळावी यासाठी लोकनेते सुनिलकाका लोमटे सामाजिक



प्रतिष्ठानच्या माध्यमातून आम्ही काम करीत आहोत असे ऍड.लोमटे सांगितले. व लातूर पॅटर्न संपूर्ण देशात घेऊन जाणाऱ्या शिक्षणतज्ज्ञ प्रा.शिवराज मोटेगावकर यांनी अंबाजोगाईत आपली डॉक्टर तयार करायच्या फॅक्टरीची शाखा सुरू करावी जेणेकरून गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना व पालकांना याचा फायदा होईल अशी अपेक्षा ही त्यांनी व्यक्त केली. यावेळी संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना सुवर्णरत्न पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण व मार्गदर्शक आरसीसी पॅटर्नचे संस्थापक संचालक प्रा.शिवराज मोटेगावकर (लातूर) हे होते. तर उदघाटक म्हणून ऍड.शोभाताई लोमटे (ज्येष्ठ विधी तज्ज्ञ तथा समाजसेविका) या होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय गंभीरे (नगरसेवक, न.प.अंबाजोगाई) तर प्रमुख अतिथी म्हणून मुमताज पठाण (ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पं.स.अंबाजोगाई), रामेश्वर मुंडे (महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी), विशाल जाजू ( बांधकाम सभापती, योगेश्वरी औद्योगिक वसाहत), दगडू लोमटे (प्रमुख, सुवर्णरत्न पुरस्कार वितरण समिती) हे मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मुक्तार शेख (समाजसेवा), अभिजीत जगताप (पत्रकारिता), सुकुमार देशमुख - मोरे (शिक्षण) आणि कल्पना देशपांडे - महाजन (कला) या मान्यवरांना त्यांनी त्यांच्या क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सुवर्णरत्न पुरस्कार-२०२४ देवून सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, फेटा, श्रीफळ, पुष्पहार व पुष्पगुच्छ असे होते. सत्कारमूर्तींनी आपले मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोप सामाजिक कार्यकर्ते संजय गंभीरे यांनी केला. तर प्रारंभी कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रगीताने करण्यात आली. प्रतिमापूजन, दीपप्रज्ज्वलनानंतर विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थितांना शाळेच्या प्रगतीचा चढता आलेख मांडणारा माहितीपट दाखविण्यात आला. प्रास्ताविक विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापिका रेखाताई बडे यांनी केले. तर सन्मानपत्राचे वाचन श्रीमती आर.एस.मोहाडे यांनी केले. यावेळी स्कॉलरशिप करीता पात्र ठरलेल्या प्रगती सुधाकर केंद्रे, आरोही उत्तरेश्वर बनाळे, गौरी अशोक नखाते, श्रावणी ओमप्रकाश कागणे, ओंकार हरिभाऊ लोमटे आणि पृथ्वीराज तात्याराव निकम या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. त्यानंतर शाळेच्या विविध विभागप्रमुखांचा चांदीचे नाणे व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. सोबतच संकल्प विद्या मंदिर शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रम ही आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी तब्बल ३१ विविध हिंदी, मराठी गीत प्रकारातून आपला कलाविष्कार सादर केला. आणि उपस्थित मान्यवर, पालक वर्गाची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती एस.एस.हरंगुळे आणि श्रीमती प्रिया नायक यांनी केले. तर उपस्थितांचे आभार श्रीमती कौशल्या शिंदे यांनी मानले. या पुरस्कार वितरण सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संकल्प विद्या प्रतिष्ठानचे सचिव प्रा.कैलास भागवत चोले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रेखा सुभाष बडे, सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमती ए.व्ही.कुलकर्णी, श्रीमती जे.आर हनवते व संकल्प परिवाराच्या वतीने पुढाकार घेण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तर आद्यकवी मुकूंदराज सांस्कृतिक सभागृह पालकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने तुडुंब भरले होते. वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# लोणार येथे विज्ञान महोत्सवाचे बनमेरू महाविद्यालयात आयोजन

**लोणार । प्रतिनिधी**

स्थानिक कै कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय लोणार व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती आणि विद्यापीठ संलग्नित नामांकित महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाची परंपरा कायम ठेवत दरवर्षीप्रमाणे याही वर्षे सातवे लोणार विज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच हेमहाविद्यालय दुर्गम परिसरातील मुला-मुलींना विज्ञानाचे शिक्षण अविरत देत असून त्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून विज्ञानची जनजागृती व वैज्ञानिक दृष्टिकोनातुन सातवे लोणार विज्ञान महोत्सवाचे आयोजना मागील हेतु साध्य करण्यासाठी या अद्भुत कल्पनेची सुरुवात आदरणीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर प्रकाश क. बनमेरू यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून साकारली आहे. त्याचीच एक प्रचिती म्हणून B.Sc. M.Sc. B.Voc. Am{U add on Cources ची सुरुवात व ज्ञानदानाचे कार्य निरंतर सुरू आहे. एवढेच नसून विद्यार्थ्यांमध्ये व शिक्षक संशोधकांमध्ये विज्ञानाची ज्योत आपल्या परिसरात असलेले जगप्रसिद्ध लोणार सरोवर याचे संवर्धन व जतन यादृष्टीने, सुशोभीकरण आणि प्रगतीबाबत प्रचार- प्रसार हा स्थानिक राज्य व तसेच राष्ट्रीय परिणामतः आंतरराष्ट्रीय स्तरावर व्हावा म्हणून लोणार सायन्स फेस्टिवल ची सुरुवात ही मागील सहा वर्षापासून सुरू केली गेली आहे.



त्याप्रमाणेच याही वर्षी लोणार विज्ञान महोत्सवाचे आयोजन कै.कु.दुर्गा कबनमेरू विज्ञान महाविद्यालय व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या सयुक्त विद्यमाने व आपल्या परिसरातील अनेक नामवंत महाविद्यालयाच्या सहकार्याने कै. कमलाबाई क. बनमेरू महिला महाविद्यालय लोणार, नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबीड ,जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा, आर .ए .महाविद्यालय वाशिम ,श्री ज्ञानदेव बुरुंगले महाविद्यालय शेगाव व तसेच विमुक्त फाउंडेशन ,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०४/०३/ २०२४ ते ०५/०३ २०२४ या कालावधीत आयोजित केला जाणार आहे. या विज्ञान महोत्सवामध्ये परंपरेचे पालन करीत असताना विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे ज्यामध्ये पोस्टरस, वैज्ञानिक मॉडेल्स ,ऑनलाईन क्विझ, अंधश्रद्धा जनजागृती यासारखे कार्यक्रमा सोबत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा त्या अनुषंगाने डॉ.कल्पना चावला सायन्स सेंटर लोणावळा व तसेच डॉ.एपीजे कलाम फिरती प्रयोगशाळा, अमळनेर हे या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण असून श्री नारायणराव भार्गव भार्गव फाउंडेशनचे अध्यक्ष, नवी मुंबई ,डॉ. विजय नागरे व्यवस्थापन सदस्य, स .गा .बा .आ .वि. अमरावती, डॉ. संतोष क.बनमेरू सचिव अमृत सेवाभावी संस्था परभणी, सौ उषा गोले अध्यक्षा, अमृत सेवाभावी संस्था परभणी त्याचबरोबर या विज्ञान महोत्सवाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. पंडित विद्यासागर माजी कुलगुरू ,एस .आर. टी .एम. यू. नांदेड, डॉ.प्रसाद वाडेगावकर, प्र-कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, डॉ. यादवकुमार मावळे ,विभाग प्रमुख,जिओलॉजी विभाग, समन्वयक ,लोणार सायन्स सेंटर ,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती ,डॉ.तुषार देशमुख, कुलसचिव ,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ , अमरावती, डॉ.सुलभा पाटील ,सह कुलसचिव ,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती हे मान्यवर उपस्थित राहणार असून सोबत सहभागी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमप्रकाश झंवर ,वाशिम, डॉ. खडसान, शेंगाव, डॉ. प्रशांत कोठे, बुलढाणा सोबत महाविद्यालयातील समन्वयक, या व्यतिरिक्त विविध विद्यार्थी संशोधक व उपस्थितांना सखोल ज्ञानदान मिळणार आहे करिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश क बनमेरू यांनी सदर लोणार विज्ञान महोत्सवामध्ये आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे या करिता अमरावती विद्यापीठा अंर्तगत सर्व महाविद्यालयातील विद्यार्थीना व महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील महाविद्यालयातील विद्यार्थीनी सहभाग नोदवून जास्तीत संख्येत उपस्थित राहून उपक्रम यशस्वी करण्याकरिता सहकार्य करून सहभागी होण्याची विनंती केली आहे.सहभागी विद्यार्थीना करिता विविध स्पर्धेत सहभाग नोदवून प्रथम व्दितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षीस ठेवलेले आहेत.

# आनंद निकेतन महाविद्यालयाचे मराठी भाषा गौरव दिनाचे अनोख्या पद्धतीने आयोजन

**आनंदवन । प्रतिनिधी**

२७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिन'.आनंदनिकेतन महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दरवर्षी या दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रमाचे आयोजन होत असते. यावर्षी म्हणजे २७ फेब्रुवारी मंगळवार ला शेगाव(बु) तालुका वरोरा येथे असणाऱ्या 'कवितेचे घर' या ठिकाणी जाऊन आनंदनिकेतन महाविद्यालयातील मराठी वांग्मय मंडळाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

साहित्याची सेवा म्हणून पूर्णतः कवितेला वाहिलेले आणि कवितेचे विविध कार्यक्रम व उपक्रम राबवण्यासाठी बांधण्यात आलेले 'कवितेचे घर' ही एक अभिनव कल्पना आहे. विकास ग्रुप,शेगाव व पेटकर कुटुंबीय यांच्या माध्यमातून या अभिनव घराची योजना आखली गेली. ६०० स्केअर फुटामध्ये बांधलेल्या घरातील भिंतींवर मराठीतील अनेक प्रसिद्ध कवींच्या कविता लावण्यात आल्या आहेत. आणि




आजवर या ठिकाणी कवितांच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन ही करण्यात आले आहे.२७ फेब्रुवारी ला आयोजित या कार्यक्रमात सर्वप्रथम कुसुमाग्रजांच्या व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.राजू मांडवकर यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना 'कवितेच्या घरा' मागची संकल्पना समजावून सांगितली. विकास ग्रुपचे सदस्य असणारे धनराज लोढे व अमोल दातारकर यांनी याप्रसंगी आपली मनोगते व्यक्त केली. धनराज लोढे,प्रा.मोक्षदा नाईक यांनी याप्रसंगी आपल्या स्वरचित कविता वाचल्या,तर प्रा.चेतना पवार, प्रा.पल्लवी ताजने, वैष्णवी रणदिवे,साक्षी झाडे, प्रिया लेडांगे यांनी याप्रसंगी विविध कवींच्या कवितांचे वाचन केले. मराठी विभाग प्रमुख प्रा.बबन अवघडे यांनी याप्रसंगी मराठी भाषा गौरव दिना संदर्भात तथा एकंदरच या उपक्रमाच्या आयोजनाबाबत, मराठी भाषेविषयी आपली भूमिका स्पष्ट केली. इंद्रजीत भालेराव यांची प्रसिद्ध कविता 'माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता' त्यांनी याप्रसंगी सादर केली.याच कार्यक्रमाच्या सुरवातीला शेगाव गावातून मराठी भाषा संवर्धन संदर्भात रॅली काढण्यात आली.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन,प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्रा. मोक्षदा नाईक यांनी केले.रामदेगी या स्थळाचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता,कार्यक्रम झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी या स्थळालाही भेट दिली.प्राचार्य डॉ.मृणाल काळे यांचे मार्गदर्शन,आयोजन समिती आणि विकास ग्रुप चे सर्व सदस्य,कवितेचे घरचे कार्यवाह प्रा. प्रमोद नारायणे व संकल्पनाकार किशोर पेटकर व इतर सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला.

# गावातील फिरत्या व्यवसायिकापासून सावधान: पोलीस निरीक्षक अजित सिंग देवरे यांचे नागरिकांना आवाहन

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

तालुक्यात अनेक गावात फिरते व्यावसायिक आपले व्यवसाय करतात त्यामुळे अशा व्यवसायिकापासून सावधान राहण्याचे आवाहन तळोधी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजित सिंग देवरे यांनी समस्त जनतेला केले आहे.

तालुक्यातील अनेक भागात अनोळखी व्यावसायिक मोटर सायकलने ,चार चाकी वाहनाने परराज्यातून आलेले जडीबुटी विकणारे, चादर, कपडे, भांडी विकणारे, दात, कान साफ करणारे ,विविध दमा औषधी विकणारे किंवा विविध वस्तूंची विक्री करणारे अनोळखी व्यावसायिक असतात त्यांच्या मनात कोणते विचार चालले हे कुणालाही माहीत नसते त्यामुळे अशा अनोळखी व्यवसायिकापासून गावकऱ्यांनी सावध राहणे गरजेचे आहे. दिवसा कुलूप बंद घरावर नजर ठेवून असे अनोळखी व्यक्ती रात्रीला येऊन चोरी सुद्धा करू शकतात किंवा गुंगीचे औषध देऊन लुबाडणूक सुद्धा करू शकतात. त्यामुळे अशा व्यवसायिकापासून सावध राहणे गरजेचे आहे तसेच त्यांना आपला आधार कार्ड ,ओळखपत्र याची प्रत देऊ नये .कारण



कोणता व्यवसायिक काय करणार हे आधुनिक युगात चांगले नाही अशा व्यवसायिकापासून सावध राहून पोलिसाकडे याची तक्रार करावी असे आवाहन तळोधी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजित सिंग देवरे यांनी केले आहे .

# तुकडोजी महाराज पुण्यतिथी व विश्वकर्मा जयंती साजरी

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

प्रतिनिधी तळोधी येथील लोहार समाजाच्या वतीने नुकतीच सुखदेव चंदनखेडे यांच्या घरी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी व विश्वकर्मा जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी अध्यक्षस्थानी सुखदेव चंदनखेडे होते .या कार्यक्रमाला पटवारी चंदनखेडे, संतोष चंदनखेडे ,रामभाऊ चंदनखेडे ,विमला चंदनखेडे, पुष्पा चंदनखेडे, तेजस्विनी चंदनखेडे उत्तरा चंदनखेडे ,रोहित चंदनखेडे लतिष चंदनखेडे ,विशाल चंदनखेडे ,गोविंदा चंदनखेडे व संपूर्ण लोहार समाज




बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने करण्यात आली.

# तळोधी (बा )येथे २ व 3 मार्चला श्री.संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सवाचे आयोजन

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

तळोधी (बा) येथील टिचर कॉलनी मध्ये २ व ३ मार्च ला श्री संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सव सोहळा चे आयोजन करण्यात आले आहे. दि. २ मार्च ला सायंकाळी ६ वाजता आरती झाल्यानंतर महिलांचे सामुहिक पारायण व भजन, तसेच रात्री ८ ते १० वाजता भजन होईल.

३ मार्च ला सकाळी ६ वाजता श्री संत गजानन महाराजांचा अभिषेक व आरती होईल. दुपारी ४ ते ६ वाजता गुरुदेव भजन मंडळाचे काल्याचे भजन होईल व सायंकाळी ६ वाजता महाआरती होऊन महाप्रसादाला सुरुवात होईल.प्रगट दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजन समितीने तसेच श्री संत गजानन महाराज व्ही.सी. गृपने केलेले आहे.





**नागभीड तालुक्यातील सावंगी (पळसगाव ) येथील रस्त्यावरील शेतात सोनबोरुचे पीक रस्त्यावरील ये-जा करणाऱ्या प्रवाशांचे लक्ष वेधून घेत आहे. छाया :प्रणय बांगरे.**

# अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती

## २८ मार्च ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शैक्षणिक सत्र २०२३-२४ करीता अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख २८ मार्च २०२४ पर्यंत असणार आहे.

चिमूर, प्रकल्प कार्यालयातंर्गत येत असलेल्या महाविद्यालयामध्ये चिमूर, ब्रह्मपुरी, नागभीड, वरोरा व भद्रावती या तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच महाविद्यालयांनी आदिवासी विकास विभागामार्फत सुरू असलेल्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवर भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना त्यांचे आधार कार्ड अपडेट असावे. आधार बँक किंवा पोस्ट यांच्याशी लिंक असावेत. शासकीय वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांनी वसतीगृह विद्यार्थी अशी नोंद शिष्यवृत्तीच्या आवेदन पत्रात करावी. अर्ज भरताना काही अडचण उद्भवल्यास चिमूर, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधावा.अर्ज करण्याची अंतिम तारीख २८ मार्च २०२४ पर्यंत देण्यात आली असून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची कार्यवाही करावी. तसेच महाविद्यालयांनी महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेले शिष्यवृत्ती अर्ज त्वरित निकाली काढण्याची कार्यवाही करावी, असे चिमूर, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी प्रवीण लाटकर यांनी कळविले आहे.

# देशहितासाठी गुणवत्तापूर्वक संशोधन व्हावे - डॉ.अनिल झेड चिताडे

## जीवशास्त्रातील आधुनिक प्रवाह,विषयावर चर्चासत्र

**चिमूर । प्रतिनिधी**

भारतामध्ये दरवर्षी पाच लाखापेक्षा जास्त संशोधन पेपर प्रकाशित होत असून त्यातून चाळीस ते पंचेचाळीस टक्केच संशोधन हे समाज उपयोगी ठरत आहे. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही भारताला नव्वद टक्के तंत्रज्ञान परकीय देशातून अवगत करावे लागते त्यामुळे संशोधकांनी आपले संशोधन गुणवत्तापूर्ण कसे होईल यावर भर दिला पाहिजे असे आवाहन डॉ. अनिल झेड. चिताडे, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान शाखा गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांनी केले.




ग्रामगीता महाविद्यालय चिमूर येथे जीवशास्त्रातील आधुनिक प्रवाहया विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. त्यावेळी डॉ. चिताडे उदघाटक म्हणून बोलत होते.या राष्ट्रीय चर्चासत्रास इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, नागपूरचे माजी संचालक माननीय डॉ. मोहन गाडेगोने हे अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी संवाद साधत असतांना, विशेषतः गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील संशोधकांना पुरेसे संशोधन साहित्य व प्रयोगशाळा उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या गुणवत्तापूर्ण संशोधनात बाधा येत आहेत. परंतु संशोधकांनी नकारात्मक विचार न करता उपलब्ध संसाधनात आपले संशोधन प्रामाणिकपणे व गुणवत्तापूर्ण पूर्ण करावे, असे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेले गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे माजी कुलगुरू डॉ. किर्तीवर्धन दीक्षित यांनी आपले अध्यक्षीय विवेचन करीत असतांना नव संशोधकांनी नवनिर्माण करण्यासाठी नाविन्यपूर्ण संशोधन करणे आवश्यक असून त्यामुळेच समाज उन्नती होईल आणि संशोधकाचा दर्जा सुद्धा वाढेल असे मत व्यक्त केले. या उदघाटनीय समारोहाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अमीर ए. धमानी यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. विवेक माणिक आणि आभारप्रदर्शन डॉ. युवराज बोधे यांनी केले. या चर्चासत्रामध्ये एकूण दोन तांत्रिक सत्र घेण्यात आले. पहिले सत्र हे डॉ. जी. डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. सचिन मीसार प्रमुख यांच्या उपस्थितीत डॉ. रुपेश एस. बडेरे यांनी 'अप्लिकेशन ऑफ ऑरगॅनिक अल्टरनेटिव्ह फॉर डिसीज मॅनेजमेंट इन क्रॉप्स'या विषयावर घेतले. त्यामध्ये त्यांनी जैविक व सेंद्रिय पर्यायांचा वापर केल्याने पिकांची प्रतिरोधक क्षमता नैसर्गिकरित्या वाढते असे मत आपल्या सदरीकारणात मांडले. तर दुसरे तांत्रिक सत्र ' आर्ट ऑफ वाईल्डलाईफ फोटोग्राफी' या विषयावर आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रसिद्ध फोटोग्राफर वरून ठक्कर यांनी घेतले. यादरम्यान त्यांनी भारतभरातील व भारताबाहेरील वन्य प्राण्यांचे विविध असामान्य फोटोग्राप्स सादर करून त्यांच्या वाईल्डलाईफ फोटोग्राफीची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात येऊन, वन्यजीव प्राण्यांच्या संवर्धनासाठी समस्या आणि उपाय यावर चर्चा केली. या राष्ट्रीय चर्चासत्राच्या अनुसंघाने नागपूरचे डॉ. अँड्रूयू, डॉ. बारसागडे, अमरावतीचे डॉ. माणिक, नवरगावचे डॉ. बाकरे , डॉ. कोरपेनवार, डॉ. मृणाल काळे, डॉ. पी.एस. झाकी, डॉ. एम. सुभाष, डॉ. ए. पी. सव्हाने, डॉ. एस. सी. मसराम, डॉ. प्रफुल्ल काटकर, डॉ. प्रवीण तेलखेंडे, डॉ. वेगीनवार या मान्यवरांचा त्यांच्या अध्यापन व संसोधकिय कार्यासाठी शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी देशभरातून विविध महाविद्यालयातील जवळपास १३० पेक्षा सहभागिनी नोंदणी केली असून राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने वेगवेगळ्या विषयावर ६० हून अधिक शोध निबंधाचे सार प्रकाशित करण्यात आले तसेच पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. समारोपीय कार्यक्रम प्राचार्य डॉ. अमीर ए. धमानी यांच्या अध्येक्षेतेखाली घेण्यात आले. त्यावेळी मंचावर डॉ. अँड्रूयू, डॉ. बारसागडे, डॉ. प्रवीण तेलखेंडे उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. निलेश ठवकर, सूत्रसंचालन डॉ. वरदा खटी तर आभारप्रदर्शन डॉ. मृणाल वऱ्हाडे यांनी केले. या चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी डॉ. संदिप सातव, प्रा. संदिप मेश्राम, प्रा. हुमेश्वर आनंदे, प्रा. शिल, प्रा. रोहित चांदेकर आणि सर्व प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# देवराव भोंगळे यांच्या आंदोलनाचा एसीसी कंपनीने घेतला धसका

■ चंद्रपूर । आशिष घुमे

**घुग्गुस शहरापासून जवळ असलेल्या एसीसी सिमेंट कंपनीने उसगाव-घुग्गुस रस्ता जो माउंट कार्मेल शाळेला सुद्धा जातो, कोणतीही पूर्वसूचना न देता रस्त्यावर आडवी भिंत बांधून बंद केला होता. हा रस्ता मंगळवार पर्यंत खुला न केल्यास बुधवारी सकाळी ११ वाजता भिंत पाडून रस्ता खुला करण्यासंदर्भात तीव्र आंदोलन करण्याची चेतावणी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराव भोंगळे यांनी एसीसी सिमेंट कंपनीच्या प्रशासनाला दिली होती.**

## अखेर उसगावचा बंद रस्ता आंदोलनापूर्वीच खुला

५० ते ६० वर्षापासून सुरू असलेला उसगावचा रस्ता एसीसी कंपनीने बंद केल्याने उसगाववासी तसेच माउंट कार्मेल शाळेच्या विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. याच रस्त्यावर एसीसी कंपनीने कोल डेपो सुरू केला, त्यामुळे शाळेमध्ये धुळीचे साम्राज्य पसरले आहे. विद्यार्थ्यांना श्वसन तसेच विविध आजाराचा सामना करावा लागत आहे.ठरल्यानुसार बुधवारला सकाळी अकरा वाजता हजारों कार्यकर्ते सोबत घेऊन देवराव भोंगळे एसीसी कंपनीकडे निघालेसुद्धा परंतु एसीसी कंपनीने आंदोलनाच्या धसक्याने आधीच वॉल कंपाऊंडची भिंत पाडून रस्ता पूर्ववत सुरू केला. आंदोलनस्थळी पोहचून देवराव भोंगळे यांनी प्रशासकीय तसेच एसीसी कंपनी अधिकाऱ्यांसोबत उद्भवलेल्या समस्यांबाबत चर्चा केली. यावर सर्व समस्या लवकरात लवकर सोडविण्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले. रस्ता पूर्ववत सुरू झाल्याने घुग्गुस-नकोडा-उसगाव ग्रामवासियांनी



आनंद व्यक्त केला.यावेळी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, माजी पं. स. उपसभापती निरीक्षण तांड्रा, माजी सरपंच संतोष नुने, उसगाव सरपंच निविता ठाकरे, नकोडा सरपंच किरण बांदूरकर, काँग्रेस नेते रोशन पचारे, माजी जि. प. सदस्य चिन्नाजी नलभोगा, धनंजय ठाकरे, प्रेमानंद जोगी, वर्षा ताजने, नकोडा उपसरपंच मंगेश राजगडकर, सिनू इसारप, साजन गोहने, राजेश मोरपाका, सतीश बोन्डे, अमोल थेरे, कुसुम सातपुते, सुचिता लुटे,बेगम ताई वैशाली ढवस, प्रयास सखी मंच अध्यक्ष किरण बोढे, पुजा दुर्गम, दिनेश बांगडे,तुलसीदास धवस,हसन शेख,सुनील बाम,सचिन कोंडावार , विनोद जनजरला,गणेश कुटेमाटे, बबलू सातपुते, रत्नेश सिंग, मल्लेश बल्ला, सीनु रामटेके, अमीना बेगम,हेमंत कुमार,नाजीम कुरेशी, जनाबाई निमकर, सुनीता पाटील, सिनू सुद्दाला, किशोर नागतुरे, अजगर खान,श्रीकांत सावे,पियुष भोंगडे, विजय माथानकर,स्वप्नील इंगोले,संदीप ठाकरे, पांडुरंग वासेकर, मोहन आवारी, कैलास देरकर, अनिकेत आवारी, अरविंद ठाकरे व मोठया संख्येत नागरिक उपस्थित होते.


---

## 'काम नाही, वेतन नाही' शासन निर्णय रद्द करा

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार सुधाकर अडबाले यांची आग्रही मागणी

चंद्रपूर । प्रतिनिधी

आदिवासी विकास विभागात कार्यरत शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारा ८ जून २०१६ चा 'काम नाही, वेतन नाही' शासन निर्णय तात्काळ रद्द करा अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात विशेष उल्लेखाद्वारे केली.



आदिवासी विकास विभागाद्वारा संचालित खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदभनि आश्रमशाळा मान्यता रद्द झाल्यास किंवा अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन होईपर्यंतच्या कालावधीत ८ जून २०१६ च्या शासन निर्णयानुसार 'काम नाही, वेतन नाही' हे धोरण लागू करण्यात आले आहे.'काम नाही, वेतन नाही' हे धोरण लागू करणे म्हणजे एक प्रकारे कर्मचाऱ्यांना वेठीस धरणे होय. या शासन निर्णयामुळे राज्यातील आदिवासी विभागामार्फत संचालित शाळांतील कर्मचाऱ्यांवर फार मोठा अन्याय झाला आहे. या धोरणामुळे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी अतिरिक्त ठरल्यास अश्या कर्मचाऱ्यांवर समायोजन होईपर्यंत वेतन न मिळाल्याने आर्थिक संकट ओढावत आहे. यामुळे आदिवासी विभागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ही दुटप्पी भूमिका शासनाने मागे घ्यावी, यासाठी आमदार सुधाकर अडबाले हे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनात आदिवासी विकास विभागातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारा जाचक असा ८ जून २०१६ चा शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी विशेष उल्लेखाद्वारे आदिवासी विभागाकडे केली.

---

# 'वंदे मातरम् चांदा' कॉल सेंटर वरील प्राप्त तक्रारींचा आढावा

## जिल्हाधिकाऱ्यांनी दिली सेंटरला भेट

चंद्रपूर । प्रतिनिधी

नागरिकांच्या समस्या व तक्रारीचे त्वरित निराकरण करण्यासाठी तसेच शासकीय व्यवस्था सक्षम व सुदृढ करण्यासाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून 'वंदे मातरम् चांदा' तक्रार निवारण प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या अंतर्गत सर्व सरकारी विभाग ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर एका देखरेखीखाली आले आहेत. तुकूम येथे स्थित तक्रार निवारण प्रणालीच्या कॉल सेंटरला जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी भेट देऊन नागरिकांच्या प्राप्त तक्रारींचा आढावा घेतला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार,तहसीलदार विजय पवार,तांत्रिक सहाय्यक अनुराग गयनेवार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले,कॉल सेंटरला आतापर्यंत प्राप्त तक्रारीची यादी अद्ययावत ठेवावी. तक्रारीचा विषय व सदर तक्रार कोणत्या विभागाशी संबंधित आहे,याबाबत माहिती उपलब्ध ठेवावी तसेच दैनंदिन तक्रारीची नोंद ठेवावी. ज्या



तक्रारकर्त्याचे प्रश्न प्रलंबित असतात व लवकर सुटत नाही, अशा तक्रारीबाबत प्रशासनाला कळवावे, अशा सूचनाही जिल्हाधिका-यांनी दिल्या. यावेळी श्री.गौडा यांनी आतापर्यंत प्राप्त तक्रारी,निराकरण करण्यात आलेल्या तक्रारी,प्रलंबित तक्रारी तसेच कॉल सेंटरमधील कार्यरत चमु,दैनंदिन येणारे कॉल,याबाबत माहिती जाणून घेतली.

आतापर्यंत ७१० तक्रारींचे निराकरण :'वंदे मातरम् चांदा' या तक्रार निवारण प्रणालीवर आजपर्यंत १०३८ तक्रारी प्राप्त झाल्या असून ७१० तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे. उर्वरीत तक्रारी प्रक्रियेमध्ये आहे. यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी स्वतः कॉल सेंटरच्या टोल-फ्री क्रमांकावर कॉल करून तपासणी केली. तसेच आतापर्यंत आलेल्या विविध तक्रारी जाणून घेतल्या.

अशी नोंदवा तक्रार :तक्रार नोंदवण्यासाठी १८००-२३३-८६९१ हा टोल फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे. कार्यालयीन वेळेत सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सदर टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदविता येईल. टोल फ्री क्रमांकावरील प्राप्त तक्रार rvande mataramchanda.i nया संकेतस्थळावर नोंदविली जाईल व संबंधित विभागास पुढील कार्यवाही करिता पाठविण्यात येईल.

---

## चंद्रपूरात शिव छत्रपती महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारा

# आ.किशोर जोरगेवार अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना केली मागणी

चंद्रपूर । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांचा३५० वा राज्याभिषेक सोहळा राज्यभर साजरा केला जात आहे. मात्र हे होत असतांना छत्रपती महाराज यांचा अश्वारूढ पुताळा चंद्रपूर सह राज्यातील अनेक जिल्हात आजही नाही. त्यामुळे जिथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा नाही त्या ठिकाणी पूर्णाकृती अश्वारूढ पुतळा तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घ्यावा अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिवेशनात केली आहे.

आज गुरुवारी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी अर्थसंकल्पाचा समर्थनार्थ आमदार किशोर जोरगेवार सभागृहात बोलत होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर मतदार संघातील विविध विषयांकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यावेळी बोलताना ते म्हणाले कि,सुमारे१७ किलोमीटर लांबीचा परकोट असलेले चंद्रपूर हे पुरातन शहर आहे. येथे५००वर्ष जून मंदिर असुन २ हजार वर्ष जुनी माता महाकालीची मुर्ती येथे स्थापित आहे. मात्र पूरातत्व



विभागाच्या जाचक अटिंमुळे मंदिराचा अपेक्षित असा विकास झालेला नाही. येथे चैत्र अश्विनी महिन्यात यात्रा भरते. देशभरातील भाविक येथे येतात त्यामुळे सदर यात्रा परिसराचा विकास करण्यात यावा अशी मागणी यावेळी बोलताना त्यांनी केली आहे.चंद्रपुरातील इरई नदीला वारंवार पूर येत असतो. त्यामुळे मोठे नुकसान या भागातील नागरिकांचे होत आहे. त्यामुळे येथे पुर संरक्षण भिंत बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी,विदर्भातील पंढरपूर असलेल्या वढा तिर्थ क्षेत्राला महाविकास आघाडी सरकारच्या वेळेस२५कोटी रुपये देण्यात आले होते. मात्र ते मिळालेले नाही. त्यामुळे सदर निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा,जगात सर्वाधिक वाघांचा संरक्षण करणारा आमचा जिल्हा आहे. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारने येथे टायगर सफारीची घोषणा केली होती.१७१हेक्टर जागेत२८६कोटी रुपये खर्च करत टायगर सफारी निर्माण होणार होती. चंद्रपूरच्या विकासाला चालणा मिळणार असलेल्या या घोषित टायगर सफारीचे काम तात्काळ सुरु करण्यात यावे अशी मागणही यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

> **काळा राम मंदिराचा पर्यटनदृष्ट्या विकास करा**
>
> नाशिकला काळाराम मंदिर आहे. त्याच प्रमाणे चंद्रपूरलाही प्राचीन असे काळाराम मंदिर आहे. येथे जागाही उपलब्ध आहे. त्यामुळे या मंदिराच्या पर्यटनदृष्टा विकास करण्यासाठी १०कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा अशी मागणी यावेळी अधिवेशनात बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे

---

# ताडोबा महोत्सव दरम्यान शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल

## नागरिकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याचे आवाहन

चंद्रपूर । प्रतिनिधी

शहरात दि. १ ते ३ मार्च २०२४ पर्यंत ताडोबा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवामध्ये चांदा क्लब ग्राऊंड येथे ३ दिवस सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाकरीता नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्याकरीता महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३(१) (ब) नुसार सार्वजनिक ठिकाणी सुरळीत रहदारी व सुव्यवस्था राखण्यासाठी करावयाच्या उपयोजना व नियमनासाठी, चंद्रपूर मार्गावर वाहतूक सुरळीत चालावी. वाहतुकीस कुठल्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये व जनतेला त्रास तसेच गैरसोय होऊ नये. याकरीता वाहतूक व्यवस्थेमध्ये बदल करण्याबाबत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी अधिसूचना निर्गमित केली आहे.दि. १ ते ३ मार्च २०२४ पर्यंत दुपारी १२ ते रात्री १२ वाजेपर्यंत वरोरा नाका ते मित्र नगर चौक तसेच पाण्याची टाकी ते वरोरा नाकापर्यंतचा मार्ग हा ताडोबा महोत्सवाकरीता येणाऱ्या वाहनाखेरीज इतर सर्व प्रकारच्या वाहनाकरीता बंद राहील. तसेच सदर मार्ग नो हॉकर्स झोन म्हणून घोषित करण्यात येत आहे.

वाहतूकदारांनी या पर्यायी मार्गाचा करावा अवलंब:सदर कालावधीत नागपूरकडून शहराकडे जाणारी वाहने वरोरा नाका-उड्डाणपूल- सिद्धार्थ हॉटेल- बस स्टॅन्ड-प्रियदर्शनी चौक मार्गे किंवा जिल्हाधिकारी निवासस्थान मार्गे जिल्हा स्टेडियम-मित्र नगर चौक-संत केवलराम चौक मार्गे शहरात प्रवेश करतील. सदर कालावधीत शहरातून बाहेर जाण्यासाठी नागरिकांनी जटपुरा गेट-प्रियदर्शनी चौक-बस स्टँड चौक-सिद्धार्थ हॉटेल-उड्डाणपूल-वरोरा नाका मार्गे किंवा संत केवलराम चौक-मित्र नगर चौक- जिल्हा स्टेडियम-जिल्हाधिकारी निवासस्थान मार्गे बाहेर जातील.**या ठिकाणी असेल पार्किंग व्यवस्था :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, चांदा क्लब समोरील न्यू इंग्लिश/दरगाह मैदान, चांदाक्लब समोरील चर्च मैदान(फक्त दुचाकी वाहनांकरिता) तसेच कृषी भवन जवळील मैदान/ट्रॅव्हल्स स्टॅन्ड या नियोजित ठिकाणी पार्क करावीत.नागरिकांनी सदर अधिसूचनेचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले आहे.

---

# आजपासून तीन दिवस चंद्रपुरात ताडोबा महोत्सव

## परिसंवाद, चर्चासत्रासोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांचीही मेजवानी



चंद्रपूर । प्रतिनिधी

जगप्रसिध्द ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पातर्फे वन्यजीव संरक्षण, शाश्वत पर्यटन आणि स्थानिक वारसा यांना चालना देण्यासाठी राज्याचे वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून १ ते ३ मार्च २०२४ या कालावधीत तीन दिवसीय ताडोबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २०० पेक्षा जास्त अधिवास असलेल्या आणि वाघांची भूमी म्हणून प्रसिध्द असलेल्या चंद्रपूरमधील विविध ठिकाणी हा भव्य महोत्सव होणार आहे.कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी १ मार्च रोजी विविध सत्रे आणि प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. सुरवातीला वन अकादमी येथे सकाळी ११ वाजता ग्रामविकास समितीचे सदस्य, सरपंच आणि उपसरपंच यांच्यासोबत मानव - वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याबाबत चर्चा आणि निसर्ग प्रश्नमंजुषा आयोजित आहे. तसेच सायंकाळी ५ वाजता चांदा क्लब ग्राऊंड, चंद्रपूर येथे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्यानंतर वाळू शिल्पकार सुदर्शन पटनायक यांचा सँड आर्ट शो आणि श्रेया घोषाल यांची लाईव्ह संगीत संध्या कार्यक्रम होणार आहे.२ मार्च रोजी सकाळी ११ वाजता रामबाग कॉलनी, चंद्रपूर येथे रोपट्यांपासून जगातील सर्वात मोठी शब्दरचना 'भारतमाता' लिहून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच दुपारी १२ वाजतापासून वन अकादमी येथे विविध चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता चांदा क्लब ग्राऊंड येथे प्रसिध्द कवी कुमार विश्वास यांचे कविसंमेलन आणि ग्रॅमी पुरस्कार विजेते संगीतकार रिकी केज यांचे संगीतसंध्या कार्यक्रम होणार आहे.३ मार्च रोजी दुपारी १२ वाजता वन अकादमी येथे सी.एस.आर. परिषद - सहयोगातून संवर्धन तर सायंकाळी ५ वाजता चांदा क्लब ग्राऊंड येथे समारोपीय कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र वनभुषण पुरस्कार व इतर पुरस्कार सोहळा आणि प्रसिध्द अभिनेत्री हेमामालिनी आणि त्यांच्या संचातर्फे भारतातील नद्यांवर आधारीत 'गंगा बॅलेट' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .